तत्वाचा बंदा जीव मूर्तीला कोण विचारी ?

प्रभुतरुण

Keeping the Pathare Prabhu community updated since 1923

APRIL 2024 – Issue No. DPT 04

editor.prabhutarun@gmail.com

*From the Editor's Desk*

**कल्पना सुनील राणे**



# सजगता महत्त्वाची

काही दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मायक्रोसॉफ्टचे संस्थापक बिल गेट्स यांनी घेतलेली मुलाखत पाहण्यात आली. एआय तंत्रज्ञानाबाबत तो संवाद होता आणि पंतप्रधान मोदी भारतातल्या टेक्नॉलॉजीतल्या बदलांवर, प्रगतीवर मनमोकळेपणाने बोलत होते. आर्टिफिशियल इंटेलिजन्सपासून टेक्नॉलॉजी, आरोग्य सेवा, हवामान बदल आणि ड्रोनच्या वापरामध्ये महिलांचा वाढता सहभाग असे अनेक मुद्दे यात होते.

एआय म्हणजेच कृत्रिम बुध्दिमत्तेचा वापर लोकांच्या दैनंदिन जीवनात मदत करण्यासाठी व्हायला हवा. जर एआयचे तंत्रज्ञान एखाद्या जादूच्या कांडीसारखे वापरले वा गैरकारभारासाठी वापरले तर ते अन्यायकारक  होईल. तसेच त्याचा वापर आळशीपणा लपवण्यासाठी किंवा चुकीच्या कामांसाठी केला तर ते बरोबर नसेल, असेही ते म्हणाले.

टेक्नॉलॉजी आपली कामे सोपी करण्यासाठी आहे. परंतु सुबुध्दीसोबत कुबुध्दीसुध्दा समाजात नांदत असते म्हणून गुन्हे घडतात. जिथे पैसा तिथे धोका हे सूत्र सायबर गुन्ह्यांमध्ये दिसून येते. याचे प्रकार व प्रमाण धडकी भरवणारे आहे आणि हे आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या साहाय्याने, मदतीने होत आहे. टेकनॉलॉजीच्या अत्याधुनिक रूपड्याचा वापर आपण सगळेच करत आहोत. ई-शॉपिंग, पेमेंट ॲप, व्हाट्सॲप, फेसबुक, यूट्यूब, ऑनलाईन व्यवहार... यांनी आपल्या मनोरंजन व आर्थिक व्यवहार करण्यात सुलभता आणली आहे. पण आर्टिफिशियल इंटेलिजन्स जर नीट वापरले गेले तर त्याचे अनेक फायदे आहेत. परंतु त्याचा फायदा जर गुन्हे करण्यासाठी झाला तर मग मात्र खूप कठिण आहे.

काही दिवसांपूर्वी दाक्षिणात्य अभिनेत्री  रश्मिका मंदाना डीपफेकची बळी ठरली. डीपफेक व्हिडिओ म्हणजे नेमके काय ? तर डीपफेक व्हिडीओ टेक्नॉलॉजी म्हणजे आपले हुबेहूब आणि तंतोतंत अगदी बारीक सारीक बारकाव्यासकट बनवलेला व्हिडीओ डुप्लिकेट, तो एका चुकीच्या पध्दतीने बनवलेला असतो. चेहरा एकाचा व धड दुसऱ्याचे इतके बेमालूम पध्दतीने मिश्रण केलेले असते की आपल्याला तो व्हिडीओ बघून आपला नाही म्हणताच येणार नाही इतका खरा वाटणारा व्हिडीओ. अशा पध्दतीने टेक्नॉलॉजीचा गैरवापर करुन हा डिपफेक व्हिडीओ बनवला जातो. रश्मिकाने फेक व्हिडीओबाबत गहजब केला म्हणून  सरकारी पातळीवर हालचाल झाली. गुंटूरच्या इमानी नवीन या इंजिनिअरला अटक झाली. इन्स्टाग्रामवर फॉलोवर्स वाढवण्यासाठी त्याने एका भारतीय वंशाच्या ब्रिटिश इनफ्लून्सर झारा पटेलला मंदानाचा चेहरा लावला आणि सोशल मिडिया पेटवून दिले. मंदाना ऐवजी सामान्य मुलीचा चेहरा लावला असता तर ती मुलगी शरमेने होरपळली असती. पैशासाठी किंवा अन्य कारणासाठी असे कोणाबाबतही घडू शकते.

व्हॉइस क्लोनिंग हे आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे आणखी एक अपत्य! हे वापरून आर्थिक लुबाडणूकीची अनेक प्रकरणे होताना दिसत आहेत. व्हॉइस क्लोनिंग करताना हॅकर कोणाचाही आवाज रेकॉर्ड करून त्या आवाजाला एआय टूलने प्रोसेस करतो. त्याला नवे रूप देतो. तो आवाज एखाद्या आवाजाशी इतका मिळताजुळता असतो की समोरची व्यक्ती ओळखीचा आवाज वाटून त्याला लगेच बळी पडू शकते. तो आवाज आपल्या मुलीचा आहे असे समजून पैसे ट्रान्सफर झाले आहेत. प्रसिध्द व्यक्तींचे आवाज क्लोन करून चुकीची वक्तव्य सोशल मीडीयावर व्हायरल होताना दिसत आहे. या तंत्रज्ञानाच्या वाढत्या दुरूपयोगामुळे बरेच नुकसान होऊ शकते वा होत आहे. एआय तज्ज्ञांच्या मते या बनावट ऑडिओ किंवा व्हिडिओमुळे चुकीची माहिती पसरली जाऊ शकते. त्याचा येणाऱ्या निवडणुकांना फटका बसू शकतो. निवडणुकांच्या काळात नेत्यांच्या भाषणाचा वापर केला गेला तर ही व्हॉइस क्लोनिंगची समस्या उग्र रूप धारण करू शकते. सायबर गुन्हेगार विविध स्त्रोतातून आवाजाचे नमुने एकत्र करू शकतात. सोशल मिडियावरील व्हिडीओ, सार्वजनिक भाषणे, इंटरसेप्ट केलेले कॉल या आधारे आवाजाचे नमुने एकत्र केले जाऊ शकतात.

जसे माहिती तंत्रज्ञानाचे विश्व बहरत आहे. तसतसे सायबर गुन्हेगारीचे प्रमाणही वाढत चालले आहे. एआय पासून तयार होणारे व्हॉइस क्लोनिंग व डीप फेक सारखे नवे प्रकार समस्या वाढवत आहे. स्कॅमरकडून आईवडिलांच्या आवाजाची नक्कल करून पैशांची मागणी करत गंडा घातल्याची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. बँकेकडून बोलत आहोत असे सांगून तसेच ओटीपी मागून बँक खाती रिकामी केली जात आहेत. लोकांनी आता डिजिटल फूटप्रिण्टबाबत सजग राहणे महत्त्वाचे आहे. फूटप्रिण्ट म्हणजे ऑनलाईन कागदपत्रे अपलोड करताना वा व्यवहार, ती करताना काळजी घेतली पाहिजे. अनोळखी नंबर किंवा तातडीने मदत मागणाऱ्या कॉलपासून सावध राहायला हवे. कारण सजगता फसवणुकीपासून बचाव करू शकते. एआयच्या तंत्रज्ञानाच्या वाढत्या दुरूपयोगामुळे व्हॉइस क्लोनिंगचे आव्हान मोडून काढण्याची आज गरज आहे. त्यावर अंकुश असणे महत्त्वाचे आहे. सरकारच्या सायबर/डिजिटल विभागाकडून संशोधन व गैरव्यवहार टॅप करणे चालू आहे पण आपण दक्ष राहणे महत्त्वाचे आहे. टेकनॉलॉजी आता आपल्या जीवनशैलीचा भाग बनली आहे आणि तिचा वापर हा होणारच. लाईव्ह लोकेशन, खासगी माहिती न देणे, फोटो शेअर न करणे याची काळजी लोकांनी घेतली पाहिजे असे सायबर गुन्हे प्रतिबंधक विभागाचे म्हणणे आहे. गुन्हेगार मानवी कल लक्षात घेऊन सापळा रचतात. त्या सापळ्यात अडकवण्याचे तंत्र मोडून काढण्यासाठी सर्वसामान्यांनी सजग व सर्तक राहणे महत्त्वाचे आहे.

————————

बहरला हा मधुमास…

नवनिर्मिती करणारा, फुलणारा, बहरणारा, सर्जनशील वसंतऋतूचे आगमन झाले आहे. वसंत ऋतू म्हणजे खूप गोष्टींची, खूप आठवणींची लयलूट!! नववर्षाची सुरुवात, उभारलेली गुढी, चैत्रांगण, कोकीळेचे कूजन, मोहोरलेला आम्रवृक्ष, रामनवमी, हनुमान जयंती, अक्षय तृतीया, मोगऱ्या- चाफ्याचा घमघमाट, लालिमा लेऊन डवरलेला गुलमोहोर, सोनेरी पिवळाजर्द बहावा, चैत्रगौरीची पूजा, आंब्याची डाळ, कैरीचे पन्हे, आंबा, फणस, वाळवणं, आईस्क्रीम, सरबत, गुलकंद, परीक्षा, सुट्ट्या, लग्नसराई इत्यादी इत्यादी. जणु निसर्गाचा सृजन सोहळा.

वसंत ऋतूत उन्हाच्या झळा मागे टाकत निसर्गाचे सौंदर्य जास्त खुलते आणि चैत्र आणखी नखरेबाज होतो. नेहमीच्या धावपळीच्या जगतातून फुरसतीचे क्षण काढून निसर्गाकडे वळून पाहिले तर दिसेल बहरलेल्या मधुमासाची एक अजब किमया… तो सर्व रूपांनी, भावनांनी व्यक्त होत असतो. चैत्राचे चैत्रपण गुढी उभारण्या पलीकडे आहे. निसर्गाच्या रंगगंधात न्हाऊन निघण्यात आहे. कारण निसर्ग हा शब्दात पकडायचा नसतो तर तो अनुभवायचा असतो.

# चैत्रांगण

**मुकुला प्रदीप नवलकर**

शिशिरातील अटळ पानगळ, निमूट भोगून,
एकाकी निष्पर्ण झाडे,
आता उबदार वसंतस्पर्श अनुभवत आहेत

माघाचा गारठा आणि फागाची धग सोसून, तग धरलेली सृष्टी, वसंताच्या सृजन स्पर्शाने सुखावली आहे.

अनावृत्त झाडांच्या पेरापेरात, पोपटी लवलव, दिसामाजी वाढू लागली आहे.

आणि वसंत...
तो तर कधीच एकटा येत नाही,
नेहमीच आपल्या जीवाभावाच्या मित्राला सोबत घेऊन येतो!

अर्थात नवपालवीने प्रफुल्लित, वृक्षलता,
पशुपक्षी, कृमीकीटक, कीडामुंगीसह अवघ्या सृष्टीला चैत्रचाहूल लागली आहे.

चराचरात चैतन्याला जागविणारा चैत्र मास..!
आधीच शुभारंभाचा उल्हास,
त्यात हा मधुमास, म्हणून विशेष अप्रूप!

संवत्सराच्या द्‌वादश पावलातील,
हे पहिलं वाहिलं पाऊल चैत्र महिना!
चित्रा नक्षत्र आणि चंद्रमा यांच्या पुनवभेटीचा सुमुहूर्त!

चैत्र म्हणजे चैतन्य,
चैत्र म्हणजे नवसंजीवन,
चैत्र म्हणजे उन्मेषाचा पदन्यास,
चैत्र म्हणजे बहरणारा वसंतोत्सव.
चैत्र म्हणजे भरभरून बरसणारा उत्साह,
चैत्र म्हणजे भविष्याची नांदी...!

अशा चैत्राचं स्वागत करण्यास मन अधीर आहे.
काय करु..? कसं करु..? आणि किती किती करु..?

आणि अशावेळी, मंगल समयी, जे जे काही
केवळ आणि केवळ,
निखळ आनंदाची पखरणं करते,
त्या साऱ्यांचा समुच्चय घडविण्यास,
आपली संस्कृती नेहमीच आग्रही राहिली आहे
अन् हिरीरीने पुढे सरसावत, सुखद सोहळे साजरे करीत आली आहे.

घरादाराची रंगरंगोटी, दारी गुढ्या तोरणं, अंगणात सडासंमार्जन आणि प्रसन्न वातावरण.
हृदयस्थभावांची देवाणघेवाण, शुभेच्छांची बरसात आणि पंचपक्वान्नांचं प्रसाद भोजन!
या साऱ्याचं आयोजन नियोजन आपल्या परंपरेत अगदी चपखल केलेलं आहे.

चैत्र शुद्ध प्रतिपदा…संवत्सराचा आरंभ !!

ब्रह्मदेवांनी सृष्टी निर्माण केली, त्या दिवसाचे औचित्य साधून नववर्ष साजरे केले जाते,
तो हा युगादि..!

ज्यादिवशी दुर्गा देवी प्रकट झाली होती, ती ही वर्ष प्रतिपदा..!
महाविष्णूंनी मत्स्यावतार धारण केला, तो हा दिवस पाडवा..!

विजनवासी श्रीरामांनी वालीचा वध केला,
तो हा दिवस आणि पुढे श्रीरामचंद्र चौदा
वर्षांचा वनवास संपवून सीतामाईसह अयोध्येत परतले, तोही दिवस हाच,
चैत्र शुद्ध प्रतिपदा, गुढीपाडवा…!

असे अनेक पुराणकालीन प्रसंग आणि घटना, चैत्राच्या आरंभ तिथीला जोडले गेले आहेत.

प्राचीन वाङमयातही चैत्राचा उल्लेख विशेषत्वाने आढळतो.

संत कवी मुक्तेश्वरांनी, नवपुष्पपरागात लोळण घेणाऱ्या उत्सवी वसंताचे **'पुष्पधुळी माजी लोळे वसंत'** या शब्दात वर्णन केले आहे

संत ज्ञानेश्वरांनी मधुमासाचे वर्णन करताना…
**जैसे ऋतुपतीचे द्वार | वनश्री निरंतर |**
**वोळगे फळभार लावण्येसी ||**
असे म्हटले आहे.

कवी कुलगुरू कालिदास यांच्या ऋतुसंहार या काव्यात,

**द्रुमा: सपुष्पा: सलित सपद्मं:**
**स्त्रिय: सकाया: पवन:सुगन्धि:।**
**सुखा: प्रदोषा दिवसाश्च रम्या:**
**सर्व प्रिये! चारुतरं वसंते॥**

असे वसंतऐश्वर्य, आपल्या चित्रदर्शी शैलीत रेखाटले आहे आणि सृष्टीसह प्रमदांच्या प्रमथ मनातील भावचित्रणही यात आले आहे.

अर्वाचीन काळाचा विचार करता,
चैत्र म्हटलं की आठवते दुर्गाबाई भागवतांचे ऋतुचक्र…
गदिमांचे शब्दब्रह्म अन् बाबूजींची स्वरमाया यांचे अद्वैत साधणारी अद्भुत मैफिल
गीतरामायण…!

चैत्राची प्रतिपदा ते चैत्रनवमीचा रामजन्म,
हे रामनवरात्र आणि पौर्णिमेला रामदूत महाबली हनुमंतरायाचा जन्मोत्सव म्हणजे चैत्र शुद्धपक्षात अवतरलेले जणू त्रेतायुग..!

याचकाळात जगन्माता पार्वतीदेवी, घरोघरी
आपल्या वत्सल अन्नपूर्णारुपात माहेराला म्हणून येते असाही एक विश्वास आहे.

आणि माहेरवाशिण म्हटली की लाडकोड आलेच.
त्यात अगदी उंबऱ्यातल्या आगतस्वागतापासून
मुदपाकगृहातील  तऱ्हतऱ्हेच्या स्वादिष्ट पाककृतींची, रेलचेल...
गर्भ रेशमी जरीकाठी वस्त्रांची सळसळ,
अत्तर गुलाबाचा मंद दरवळ,
माजघरातील आदबशीर लगबग,
सौभाग्यं वायन लुटून हळदीकुंकवाची देवाणघेवाण
आणि चैत्रगौरीच्या स्वागतासाठी रेखलेली,
अंगणातील नेहमीच्या रंगवल्ल्या सोबतची खास चैत्रातील विशेष रांगोळी, चैत्रांगण !!

चैत्रांगण ही रांगोळी चैत्रमहिन्याची खासियत म्हणावी लागेल, चैत्रतृतीया ते वैशाखतृतीया, अर्थात अक्षयतृतीयेपर्यंत रोजच सजणारे चैत्रांगण ..!
चैत्रांगण म्हणजे अवघ्या संस्कृतीचे राजस रुपडं, लोभस प्रतिबिंब.

याविषयी एकेठिकाणी कवि प्रतिभेने काय म्हटले आहे ते पहा,....

**होते अंगण गोमयें सकलही संमार्जिले सुंदर**
**बालाके आपली प्रभा वितरली नेत्रोत्सवा त्यावर**
**तीची जी भगिनी अशी शुभमुखी दारी अहा पातली;**
**रांगोळी मग त्या स्थळी निजकरे घालावया लागली**
**आधी ते लिहिले तिने रविशशी, नक्षत्रमाला तदा,**
**मध्ये स्वस्तिक रेखिले मग तिने आरेखिले गोष्पदा;**
**पद्मे, बिल्वदले, फुले, तुळसही, चक्रादिके आयुधे,**
**देवांची लिहिली न ते वगळिले**
**जे चिन्ह लोकी सुधे...**

खरोखरच, असं ज्याचं सविस्तर वर्णन करतांना, कवी थकत नाही, ते चैत्रांगण ..!

गोमयाने स्वच्छ सारवलेल्या अंगणात
गेरूच्या चौकोनात सजणारी,
पांढऱ्या स्फटिक चुऱ्याने काढलेली
शुभ्र धवल रांगोळी म्हणजे चैत्रांगण!

यात रंगांचा वापर केला जात नाही तरी अवघी सृष्टी यात प्रतिबिंबित होते. नव्हे स्वतःच सम्मिलित होते. अवतरीच होते म्हणा ना.

या चैत्रांगणात एकूण ६४ विविध शुभचिन्हे असतात,
६४ या संख्येला आपल्या संस्कृतीत वेगळे महत्त्व आहे...
परंपरेच्या प्रवाहात ही संख्या जरी अर्ध्यावर उतरली असली तरी निसर्ग आणि जीवसृष्टी यांच्यातील नातेसंबंध आणि जीवाशिवाचं तादात्म्य, ह्या रंगावलीत अधोरेखित होते, हे निश्चित.

विश्वाच्या निर्मितीची बीजरुप चोवीस मूलतत्त्वे,
जीवशिव स्वरुप वा सृजन नक्षत्रे दर्शविणारे, अनुराधा आणि स्वाती हे प्रतिकद्वय.

अनादी कालापासून अस्तित्वात असलेले सूर्य, चंद्र, तारे, नक्षत्र आणि सत्व, रज, तम, अशी त्रिगुणात्मक जीवसृष्टीची प्रतिके.

देवत्वाच्या संकल्पनेला साकारणारी अस्त्र, शस्त्र, आयुधं.. शंख, चक्र, गदा, त्रिशूळ, धनुष्यबाण
तसेच वाहने म्हणजे हत्ती, वृषभ, गरुड
देवतांच्या आराधनेतील पद्म, बेल, तुळस, दुर्वा इत्यादी.
देवत्वाची शुचिता सांभाळणारी कासव, ज्ञानकमळ, ब्रह्मकमळ, कलश, श्रीफळ.
जीवन बोध गाणारी बासरी, तुळशी वृंदावन, मोरपीस, डमरू, टाळ, सनई-चौघडा,

आंबा, उंबर, पिंपळ वगैरे पूजनीय वृक्ष,

संपत्ती समृद्धी ऐश्वर्य यांचा संकेत देणारी
अंबारीसह हत्ती, गाय-वासरु हे कामधेनूचे प्रतीक.
घोडा, नागयुगुल आणि मोर तसेच मासा ही सौंदर्य आणि वैभवाची प्रतीके.

ॐ, स्वस्तिक...ही शुभ प्रतिकात्मक चिन्हे
लक्ष्मीची पावले, गोपद्म ही धनसंपदा व सृजन यांची प्रतीके.

माहेरवाशीण गौराई पार्वतीबाईंसाठी आरसा फणी,
हळदी कुंकवाचा करंडा,
सौभाग्यलेणी मणी मंगळसूत्र,
सुवासिनींच्या ओटीचे तबक.

...आणि अशा या रंगावलीच्या शीर्षस्थानी,
आंब्याची पाने अन् भरगच्च गेंदांचे,
दिमाखात झुलणारे, लफ्फेदार तोरण
अन् नववर्षारंभ म्हणून चितारलेली गुढी..!

ही सारी संस्कृतीची शुभप्रतिके,
म्हणजेच शुभ्र धवल रांगोळी भरून काढलेले चैत्रांगण...!

चैत्रांगण हे महाराष्ट्राच्या कला व परंपरेचे,
चैत्रमासातील खास, आगळेवेगळे असे आविष्करण आहे.
तसेच, वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती शिल्पाचा आणखी एक प्रकार म्हणजे...

अश्विन कृष्णअष्टमी, आठविंद्यापासून
एक एक तिथीनुसार..
एक एका पावलाने घरीदारी, अंगण, परसात,
गोठ्यात आणि कोठारात
अवतरणाऱ्या दिवाळीच्या हार्दिक स्वागतास,
आसन्या, बोंडल्या, तेंडल्या, खांबल्या, देवल्या, नांगऱ्या, पोखरण, रावली, धनदिवे, लक्ष्मीची पाऊले,
पाडव्याला पट, स्वस्तिक इत्यादी रांगोळ्या...
त्याआधी विजयादशमीला आपट्याची पाने, भगवती विद्यादेवी पूजनास सरस्वती यंत्र,
तसेच गोवत्सद्वादशीला सवत्सधेनू आणि तुलसी विवाहाची मंगलघटिका साजरी करण्यासाठी वृंदावन,
मोर, गजद्वय या शोभनीय रंगवल्ली रेखल्या जातात.

आता तर कलासक्त आणि कृतीशील
अशा ज्येष्ठ पिढीला, हरहुन्नरी उद्यमशील आणि विनम्र अशा तरुण पिढीची साथ मिळाली आहे.
आणि आधुनिकतेचा बाज लेवून,
सणसमारंभाचा आनंद द्विगुणित करणारी,
रंगीत खडे, मण्यांची कुंदनकारी, कलाकुसर मिरविणारी, दिमाखदार डिझायनर रांगोळी;
ज्यात तऱ्हेतऱ्हेचे आकृतीबंध, जे कधीही मांडावेत आणि सजावटीची शोभा वाढवावी असे उपलब्ध आहेत.

मुळात रांगोळी ही सात्विक संस्कृतीचे
आटोपशीर प्रतिरुप आहे.
मांगल्य आणि प्रसन्नतेचा गौरवशाली
आविष्कार आहे.

रांगोळी ही सर्व सामान्य लोकजीवनात वंशपरंपरागत रुजलेले, भारतीय सांस्कृतिकतेचे एक सहज परिमाण, एक जानपद लेणं आहे.

जीवनविषयी, सनातन आस्थेला, राजस कोंदणात मढविणारी लोककला आहे
दिनविशेष अधोरेखित करुन, त्याचे आंतरिक सौंदर्य प्रगट करणारी प्रथा आहे

ऋतूचक्राशी ताळमेळ साधण्याची एक उर्मी आहे.
तसेच निसर्गक्रमात तनामनाने अग्रेसर होत रमणारी एक जाणीव आहे.
अर्थात ब्रह्मनिर्मिती सदृश्य प्रतिकृती, प्रतिसृष्टी निर्मितीचे आवाहन आहे.

अशी ही मनामनातील सांस्कृतिक आस्था जपणारी, अलिपना, कोलम, पुक्कलम,
नामकरण कोणतेही असले तरी,
रंग ठिपके आणि रेषांनी उलगडत जाणारे हे लोककलावैभव जपणे आवश्यक आहे

आणि म्हणून या चैत्रारंभी शुभमुहूर्तावर
म्हणावेसे वाटते की,

हे नवसंवत्सर, चैत्रांगण रुपात, तुम्हाआम्हा साऱ्यांच्या जीवनात, सजावं, सजवावं, साजरं व्हावं..!!

हीच आहे या घडीची शुभकामना ..!

|| शुभं भवतु ||

# पत्रास कारण कि...

**संजय शरद दळवी**



हल्लीच्या पिढीला हा मायना कळणारच नाही, आणि त्यात त्यांची काही चूक आहे असे मला तरी वाटत नाही. आजच्या इंटरनेटच्या जगात, व्हाट्सअॅप, ट्विटर, इंस्टाग्राम, सिग्नल, स्नॅप-चॅट, वगैरे अॅप्सवरून क्षणार्धात हव्या असलेल्या व्यक्तीशी कॉन्टॅक्ट, म्हणजे संपर्क करणे त्यांना सोपेच वाटणार. गेल्याच वर्षी, माझ्या एका मित्राने त्याच्या घरी गणपतीनिमित्त जमलेल्या नातेवाईकांच्या जवळ जवळ नऊ-दहा मुलांना एका खोलीत बसलेले असतानाचा फोटो पाठविला होता. सर्वांची मुले, आपापल्या मोबाईलमध्ये दंग होती. कोणी गेम खेळत होते तर कोणी चॅट करत होते आणि मित्राने सांगितले की मजा अशी की त्यातले दोघे-तिघे एकाच खोलीत बसून, एकमेकांशी चॅट करत होती. आता काय म्हणावे ह्या कर्माला?

ह्या संपर्कातून संवाद हरवलाय हे कसे कळणार त्यांना?

सहवासाविना वाद नाही, आणि वादाविना संवाद होऊ शकत नाही. तू सांगतोय ते बरोबर का मी सांगतोय ते बरोबर, अशा एखाद्या गोष्टीवरून हिरीरीने वाद घालणे संपलंय आता. कुठल्याही प्रश्नाचे अचूक उत्तर द्यायला गूगलबाबा सदैव उभेच असतात. अर्थात, ह्या सर्व तांत्रिक प्रगतीविषयी माझ्या मनात कुठलाच आकस नाही, असलाच तर मानवाने घेतलेल्या ह्या अफाट झेपेबद्दल प्रचंड आदर आहे. पण म्हणून माणसाने यंत्राच्या इतक्या अधीन व्हावे हे मनाला पटत नाही.

आमचा सोनू मोबाईल हातात दिल्याशिवाय जेवायलाच तयार होत नाही, असे जेव्हा एखाद्या सोन्या, छकुल्याची आई अभिमानाने सांगते तेव्हा वाटते सांगावे, की बाई आत्ताच आवर, नाहीतर तुझ्यावर पश्चातापाची पाळी येईल. पण आपण काही बोलत नाही आणि तिलाही काही कळत नाही व असेच सोनू, शकू, मोबाईलच्या जाळ्यात गुंगत जातात. आधी कौतुक करताना न थकणारे आईवडील हताश होऊन बघत राहतात. आजकाल घरा घरातून संवाद हरवले आहेत. इंटरनेटचे महाजाल, त्यावर पोसणारे स्मार्ट टीव्ही, वेब सिरीज, निरनिराळे अॅप्स, प्रत्येका हाती असणारे मोबाईल, लोकांना वेळच नाही आहे दुसऱ्या कुणाकडे बघायला. वाढदिवसाच्या, कुठल्याही महत्वाच्या दिवसाच्या वा सणासुदीच्या दिवशी हल्ली भेटणे दुर्मिळ झालंय. त्यापेक्षा पटकन एक व्हाट्सअॅप संदेश टाकला की आपली इतिकर्तव्यता होते.

मुद्दा असा की हल्ली सहवास हाच दुर्मिळ झालाय. भेटगाठी सटीसमाशी व एखाद्या कार्यानिमित्त होतात. लहानपणी सुट्टीच्या दिवसात आजोळी जाणे आता संपलंय. मामाच्या गावाला जाऊया पेक्षा चौकोनी कुटुंब लॉंग टूर्सवर जातात. लोकांकडे एकंदरीतच पैसा बहू होऊ घातलाय. ह्यात वाईट काहीच नाही, पण हे सर्व करताना ओलावा जपायला काय हरकत आहे?

एक खरी झालेली गोष्ट सांगतो. जर्मनीला असताना, औस्टेंड (म्हणजे इंग्लिशमध्ये इस्ट एंड) ह्या  तिथल्या एका टुमदार शहरात अचानक एका जुन्या मित्राची भेट झाली. औस्टेंड शांत, विलक्षण पण आरामदायी आहे व अनेक कुटुंबे, तरुण व्यावसायिक आणि प्रवासी आंतरराष्ट्रीय स्तरावर लोकांमध्ये अतिप्रिय आहे. त्या परिसरात, तुम्हाला सर्व जगातील रहिवाशांची संमिश्र गर्दी आढळेल. विविध कालखंड आणि प्रभावांनी  प्रेरित असलेल्या वास्तुकलेच्या 'नॉकअबाउट' संग्रहासह हा परिसर देखील खूप वैविध्यपूर्ण वाटतो. कॉफी पीत जुन्या आठवणी जागल्या गेल्या. तो एका जर्मन मुलीशी लग्न करून तिथेच सेटल झाला होता. त्याने आवर्जून शनिवारी त्याच्या घरी जेवायला बोलावले. संध्याकाळी सातला नक्की पोच असे आग्रहाने बजावून  त्याने आपला पत्ता दिला. मी शनिवारी गुगलमॅपवरून चेक करून बरोबर त्याच्या घरी पोहोचलो. साधारणपणे सव्वासहा वाजले असावेत. उशीर नको करायला म्हणून थोडा लौकरच निघालो होतो. घर कसले, ती तर एक छोटीशी बंगलीच होती. सभोवताली छोटीशी पण निगा राखलेली बाग होती. मी पुढे शिरून दरवाजावरची बेल दाबणार इतक्यात एका मुलीने दरवाजा उघडला. छोटेखानी अशी तिला बघूनच माझ्या लक्षात आले की ही फिलिपिनो मेड असावी. मी माझे कार्ड तिला दिले, तर तिने व्हरांड्यातल्या खुर्चीकडे हात दाखवून मला बसायला सांगितले. मी विसावलो, तर ती बया दरवाजा बंद करून अदृश्य झाली. घड्याळाचा काटा पुढे सरकत होता, आणि मी अस्वस्थ होत होतो. बरोबर सातच्या ठोक्याला दरवाजा उघडून माझा मित्र आणि त्याची जर्मन बायको, असे दोघेही बाहेर आले. त्याने मला मिठीच मारली आणि आपल्या बायकोची ओळख करून दिली, व मला आत हॉलमध्ये दोघेही घेऊन गेले. पुढचे तीन तास खूप मजा आली. त्याच्या बायकोला इंग्लिश छान बोलता येत होते, त्यामुळे संभाषणाला अडचण न होता गती मिळत गेली. ड्रिंक्स व डिनर नंतर मी जेव्हा निघालो, तेव्हा माझा मित्र  मला सोडायला फाटकापर्यंत आला. तिथे परत आम्ही थोड्या गप्पा मारल्या. तेव्हा मी गंमतीने त्याला म्हटले, साल्या, मी पाऊण तास तुझ्या व्हरांड्यात एकटाच बसलो होतो आणि तू काय बायकोला मिठ्या मारत बसला होतास की काय, आणि त्यावर तो जे म्हणाला ते ऐकून मी गारच झालो. तो म्हणाला, आम्ही दोघेही साधारणपणे साडेसहा पर्यंत तयार झालो होतो, पण आपली अपॉइंटमेंट सातची होती, म्हणून ती जरावेळ पेपर वाचत बसली तर मी टीव्हीवर बातम्या बघत होतो. म्हणजे आजच्या संध्याकाळी आमची अपॉइंटमेंट होती? मी अवाक झालो होतो, पण त्याच्या ते लक्षातसुद्धा आले नाही. बोलावलेली टॅक्सी आली होती, म्हणून मी बाय करून रवाना झालो.

आपल्याकडे असे होऊ शकते? आलेल्या पाहुण्याला बसवून ठेवून आपण घरामध्ये टीव्ही बघू का पेपर वाचत बसू? असेच एकदा सिंगापूरमध्ये, एका चिनी मित्राच्या घरी असताना, मी त्याला विचारले होते समजा आत्ता पटकन कोणी आले तर? त्यावर तो माझ्याकडे विचित्र नजरेने बघत म्हणाला, असे कसे कोणी येईल, इव्हन माझे आई वडील वा भाऊसुद्धा येऊ शकत नाही, आणि मीही असा सहज म्हणून त्यांच्याकडे जाऊ शकत नाही. आम्ही एकमेकांची अपॉइंटमेंट घेतल्या शिवाय त्यांच्या घरी नाही जाऊ शकत, ना त्यांना ते खपेल, ना मला ते आवडेल.

परदेशी प्रत्येकजण आपापली स्पेस जपतो. आपणही ती जपावी, पण म्हणून इतक्या टोकाची भूमिका आपल्या इथे घेतली जाईल, असे मला नाही वाटत.

महत्वाचा असतो तो सहवास, आणि त्याहूनही महत्वाचे असते की तो कोणाचा असावा. आर्टफिशिअल इंटेलिजन्स आपल्याला किती आणि कसा कण्ट्रोल करेल, हे आपणच ठरवायला हवे, नाही तर आपणही यंत्राहातचे खेळणे कधी बनू हेच कळणार नाही.

# बदल अपरिहार्य आहे

**मुकुला राणे नवलकर**



आम्ही, हे जग बदलताना पाहिले. आम्ही म्हणजे आमच्या पिढीने...

कुळकुळीत काळी दगडी पाटी,
रंगीत पातळ चकचकीत कागदात गुंडाळलेली,
वीतभर दगडी पेन्सिल
आणि छोट्याश्या डबीत, इवलासा स्पंज...
असा आम्ही, अभ्यासाचा श्रीगणेशा केला आणि आता लॅपटॉपच्या कीबोर्डवर सफाईने बोटं फिरवीत लिहिले जात आहे.

तेव्हा रविवारी संध्याकाळी घोडागाडीत बसून चौपाटी, हँगिंग गार्डन, मत्स्यालय, राणीचा बाग फिरुन घरी परतताना ...
राजा रिफ्रेशमेन्टचा मसाला डोसा म्हणजे चैन.
पुरोहितकडे बटाटापुरी, मसाला दूध,
प्रकाशचा बटाटेवडा, पियुष किंवा कधी कुलकर्ण्यांची भजी...

खोताच्या गल्लीतील भुलभुलैयातून,
ताजा ताजा उपवासाचा चिवडा, बटाटा वेफर्स, बटाटा सळी इत्यादी
बेगमीसाठी तळणीच्या गंधाचा मागोवा घेत,
नेमकं दुकान हुडकण्यासाठी केलेली पायपीट...

...आणि आता उबर किंवा ओलाच्या राईड नंतर झोमॅटो, स्विगीची घरपोच मेहेरबानी.

तेव्हा वाढदिवस आणि दिवाळीलाच,
सर्वांना नवीन कपडे मिळायचे.

आधी रॉक्सी थिएटरजवळच्या विमल शोरुममध्ये कापड खरेदी,
तिथून मोर्चा वळायचा खानदानी दर्जी महाशियांच्या दुकानात.
तिथे मापं देऊनही, वाढत्या अंगाचे ढगळ कपडे शिवले जायचे.
...आणि आता मोबाईलवर, थक्क करणाऱ्या विविधतेतून, साईज चार्ट बघून, आपल्या आवडीची निवड शक्य.
वर पुन्हा, नाही पटलं, तर रिटर्न.

तेव्हा सुट्टीत लिटिल थिएटर्सची, छोट्यांसाठीची नाटकं,
गणपतीबाप्पा मोरया, हं हं आणि हं हं हं,
मधुमंजिरी, हिमगौरी आणि सात बुटके वगैरे
साहित्य संघ मंदिरात, सगळ्यांनी एकत्र पाहिली.
आणि आज घरच्या घरी, प्रत्येकाला,
आपापली करमणूक, तळहातावर सहज उपलब्ध आहे.

तेव्हा कधीतरी मोठ्ठं झाल्याच्या अविर्भावात,
रेशनिंगच्या लाईनीत ताटकळत, साखर नाही तर रॉकेल तरी आणलंय,
आणि आता घरबसल्या, मॉलमधून चुटकीसरशी हवे ते, हवे तेव्हा,

बालपण आठवले की तेव्हाचे, सारे काही, चलत् चित्राप्रमाणे झर्रकन, डोळ्यांपुढे उलगडते.

संक्रांतीला काय पो छे... म्हणत कटीपतंगांसाठी गच्चीवरुन छपरावर घातलेला धुडगूस आठवतो...

उन्हाळी सुट्टीत हमखास ठरलेली माथेरानची भेट,
वळणे घेत सावकाश डोंगर चढणारी खेळण्यातली
झुक झुक गाडी,
थेट दरीत उतरणारे, लाल मातीचे रस्ते,

रस्त्यावर रिक्षा ओढणारे रिक्षावाले,

फुरफुरणारे घोडे, तिथला दर खेपेस भेटणारा,

इस्माईल घोडेवाला.

रग्बी रिसॉर्ट कॉटेज, व्हरांड्यातलं गोल टेबल,

संध्याकाळचा नाश्ता आणि त्यावेळी आजूबाजूला दहशत निर्माण करणारी दांगट माकडे...

पावसाळा आणि त्याबरोबर नुकतीच सुरु झालेली शाळा...

नवा वर्ग, नवे जुने मित्रमैत्रिणी,

नवी कोरी पुस्तकं, वह्या,

वर्गशिक्षिक कोण? याची ताणलेली उत्सुकता आणि

शाळा सुटल्यावर पायऱ्यांजवळ उभं राहून

एकेक विद्यार्थ्याला त्याच्या पालकाकडे सोपवणारे गोसावी गुरुजी, आठवतात.

मग श्रावण... रिमझिम पाऊस.

शनिवार सोमवारचा सोवळ्यातला स्वयंपाक आणि

आरती नैवेद्यानंतर, संध्याकाळी सोवळ्यातल्याच पंगती.

केळीची, दिंडीची पाने, द्रोण,

साधेच, पण पारंपरिक सुग्रास पदार्थ...

नवरात्र, दसरा, दिवाळीचा धूमधडाका तर विसरताच येत नाही,

रांगोळ्या, आकाशकंदील, पणत्या, फटाक्यांची आतषबाजी...

ओवाळणी, नवे कपडे, खाऊ, खेळणी,

फराळ, पक्वान्नं आणि अंगत पंगत...

वर्षातला आणखीन एक सण म्हणजे वाढदिवस!

घरातल्या छोट्या-मोठ्यांना वाढदिवसाच्या दिवशी औक्षण करुन, आजी बर्फीचा तुकडा भरवायची...

तेही आठवतंय,

बालपण सरले आणि त्याबरोबर काळही बदलला

वय वाढले तसे जग विस्तारले, समज आली.

तरी, ज्याचे स्वप्नही कधी पाहिले नाही,

कल्पनाविलास म्हणूनही, जे कधी सुचले नाही,

मोठं झाल्यावर मिळेल, अशा गोष्टींच्या यादीतही जे कधीच नव्हते,

ते सारे, आक्रीत म्हणावे असे,

कळत नकळत... प्रत्यक्ष अवतरले.

काळाचा महिमा म्हणून स्वीकारले गेले...

आणि आता तर पार अंगवळणी पडले आहे.

या साऱ्या सव्यापसव्यात, आनंद मात्र तोच आहे;

तेव्हाचा आणि आताचाही.

वडील माणसांच्या छत्रछायेतील, तेव्हाचं निरागस बालपण,..

जितकं सहज सुंदर होतं, तितकंच सुंदर आहे आजचं,

मुलानातवंडा सोबतचं प्रगल्भ प्रौढत्व.

कारण सौंदर्य आणि प्रसन्नता आपल्या अंतर्यामी नांदते.

मधुसेवनाचाच वसा जर घेतला असेल,

तर भवतालच्या बदलत्या चित्राचा,

साक्षीभावाने आस्वाद घेता येणारच.

तसं प्रत्येक गोष्टीत परिवर्तन घडतच असते.

ते तर अटळ आणि अपरिहार्य आहे.

मात्र बाह्यतः त्याचा स्वीकार करताना,

अंतर्यामी जुनं जपलं पाहिजे...

म्हणूनच म्हटलं, आम्ही तेच...!

तेव्हां आणि आताही...!

पण आम्ही, जग बदलताना पाहिले. ...!!

# Our Mumbai



**Sanjay Dalvi**

In Mumbai's heart, a city anew,
Emerging from the ocean's blue,
A skyline rising, dreams take flight,
In the glow of the city's vibrant light.

From fishermen's huts to towers tall,
Mumbai's transformation, a wonder for all,
A tapestry woven with threads so diverse,
In this city of PP’s, new stories immerse.

Amidst the rush and bustling streets,
The spirit of Mumbai never retreats,
A city of dreams where fortunes are made,
In its vibrant heartbeat, we find our trade.

The Arabian Sea whispers tales of old,
Of a city's resilience, a story untold,
In the waves, resilience flows like a stream,
In this newly emerging Mumbai, it's a gleam.

From Bollywood glamour to street food delight,
In Mumbai, every day is a vibrant night,
A city that never sleeps, always awake,
Where dreams are nurtured, for everyone's sake.

In the heart of this city, old and new,
Emerges Sokajinchi Mumbai, forever true,
With open arms, it welcomes all,
In its vibrant embrace, we stand tall.

So let us cherish this Mumbai's grace,
As it continues to evolve and embrace,
A city that thrives, a city so grand,
In this newly emerging Mumbai, we'll forever stand.

# Felicitating Shri Sharad B. Chaphekar

It is with a sense of great pride, that we announce that Sharad B Chaphekar has been bestowed with the prestigious Vidnyan Sanstha Award.

The Vidnyan Sanstha Ratna Award is established by The Institute of Science, Mumbai, Alumni Association, to acknowledge the contribution of eminent alumni of The Institute in the fields of Science, Technology, Education or Culture, whose work has made a difference and whose lives are role models for all to emulate.

Since 1961, Sharad B Chaphekar revived teaching and research in Ecology, giving it an Environmental bias, particularly with reference to the environmental problems of the Mumbai metropolis. He also guided research students for M.Sc. (7), M.Phil. (2) and Ph.D. (18) degrees, apart from publishing more than 80 research papers and also, a book.

Furthermore, he served as an NCC officer during the Emergency caused by the Chinese invasion in 1962, apart from training Institute cadets for four years. He resigned his commission after the Emergency was over, as a two-star Lieutenant. Apart from his personal research work, he coordinated several multidisciplinary research projects sponsored by The Institute. He also served as the National Coordinator for a research program carried out in five Centers across the country, for the Min. of Environment and Forests, New Delhi.

He also standardized methods for the cultivation of Mangroves along creeks and was responsible for the Stabilization of Ash emerging from coal-based thermal power stations. As the NSS Unit In-Charge of The Institute student volunteers, he helped Warli farmers of the Aswali village in Dahanu taluk to improve paddy yields on their farms, vis a vis the use of scientific methods of cultivation.

As a Visiting Scientist, he chaired technical sessions, delivered talks in Universities and Research Centers in the U.K., Malaysia, U.S.A., The Netherlands and Finland. He was elected Fellow of five science academies in the country, including the Maharashtra Academy of Sciences. He also penned several articles in Marathi newspapers and magazines and half a dozen books, including a translated one on the Bhopal Tragedy. These included three books for school children. Notably, he was in charge of the Botany Section for the book ‘Marathi Vishwakosh.’

Prof. Sharad Chaphekar (Age 88+) was a College and University teacher between 1959 and 1995. He was the visiting lecturer in the Institute, till 2010. He taught in The Institute of Science as Asstt. Lecturer, Lecturer, Reader in Ecology and Professor of Botany between 1959 to 1987. Also, he was the Professor of Ecology in Pondicherry University from 1987-1991, and Professor of Botany in Pune University from 1991 -1995.

He Married Sheela, daughter of the late Shri Keshavrao Senjit, Advocate.

# Competition!

**Sandhya Kirtikar**

Competition is the name of the game,
And each Generation, they play the same!


When you see little ones, just out of the cradle,
Cheeks dimpling, cutely playful,
Singing, dancing, or mouthing words, all a babble,
Eyes askance, seeking approval,
Then you know, it is for a
Competition, the game for fame,
Eager parents here, to film the same!

'ALWAYS BE A WINNER' words in frames,
Etched on Innocent minds, no need to explain!
Taking part in contests, in schools and in halls umpteen,
Rehearsals tiring, no time to complain!
Cos tis a
Competition, the game for Acclaim,
Where Innocence is the Price paid,
for a Trophy to obtain!

'WIN or LOSE' but 'GIVE YOUR BEST",
Should be the Motto of any contest!
Do what you Love, and to HIM leave the rest,
Be grateful for your talents, & enjoy the tests!
Humble in Triumph, Graceful in Defeat,
Is a SPORTSMAN, truly Blessed,
In the Competition of LIFE, which is a Game,
With Love & Laughter all aflame!!!

# News of the Month

- Ashish Vijayakar was appointed Managing Director & Chief Executive Officer of SBM Bank for a period of 3 years from February 17, 2024. Ashish Vijayakar is a veteran banker for three decades, With a strong background in building and growing global businesses. Earlier he has held key leadership positions across various geographies at Standard Chartered Bank. His leadership style, focused on fostering collaboration, nurturing talent, and maintaining the highest standards of integrity along with compliance, aligns perfectly with SBM Bank India's values and commitment to excellence.Ashish Vijayakar is the son of Rekha Anil Vijayakar and the great grandson of Barrister M.R. Jayakar.
- Vileparle Club Felicitated Niketa Rane for her support to make the VLP Urban Flea Market a grand and successful event held at the Pathare Prabhu Society Hall, Khar.
- Laisha Mihir Rajiv Talpade won the INDIA SPELLING BEE - SCHOOL WISE MERIT LIST (Group 3, Grade 4) for the year 2023-2024 Laisha studies at THE BAI AVABAI F. PETIT GIRLS' HIGH SCHOOL.
- Kalpana Rane Award - Our very own Prabhu Tarun Editor - received the Rashtra Shakti Puraskar jointly presented by Make Earth Green Again (MEGA) Foundation, The Power Women's Collective, and Pawsitive Farm Sanctuary. This prestigious accolade aims to honour individuals and organizations who have demonstrated outstanding commitment in their respective fields, as well as to recognize those who have shown exemplary dedication, innovation, and leadership in shaping a sustainable future for our nation. She received the award from Arjuna Awardee & former Cricket Captain Diana Edulji. Kalpana is a very experienced journalist and currently Creative Editor with the Saamna Newspaper.
- Sukrit Vijayakar- Sukrit Vijayakar has won the Dr.Sambasiva Rao Memorial Rolling Trophy in the Pairs category at FNCC All India National Open Bridge Tournament conducted in Hyderabad in March '24. It is regarded as one of the most prestigious Bridge Tournaments held in the country.
- Sharad Chaphekar who is married to Sheela, daughter of late Shri Keshavrao Senjit won the 'Vidnyan Sanstha Ratna' Award. This award is established by The Institute of Science, Mumbai, Alumni Association, to acknowledge the contribution of eminent alumni of The Institute in the field of Science, Technology, Education or Culture, whose work has made a difference and whose lives are role models for all to emulate.
- Tanish & Trishan Rohan Pradhan live in New Jersey borough of Oradell. They had participated in town's yearly calendar contest. This is their town's annual tradition where many kids from Oradell Public School from KG to 6th Grade participate and only 12 artworks make it to the town's calendar. The theme for this year was "Veterans and Armed Forces". Both kids consulted mom and dad about ideas and executed these paintings which the town has selected. This is a great motivation for them to continue working on their art skills.



# Prabhu Tarun Diary

**Examination Results**

- EXAMINATION RESULTS-
- Rishikesh Aishwarya Tej Velkar : Master of Science in data analysis and applied economics Dec 23 from University of Nevada - Las Vegas
- Ishaan s/o Sanjana & Deepak Kothare : Post Graduate Programme in Business Administration from Indo German Training Center

**Wedding Anniversary**

- Golden Wedding Anniversary : Shobha (Nanda) Nandkumar Dhairyawan and Nandkumar Chandrakant Dhairyawan on 10th March 2024

**Om Shanti. We lost these members in the recent past.**

- Sunila Nandkumar Vyavaharkar - age 80 years on 18th February 2024 at Thane
- Pratiksha Deepak Kothare - age 53 years on 21st February 2024 Khar
- Kishori Shankar Trilokekar - age 88 years on 26th February 2024 at Andheri
- Pavitra Pradip Kirtikar - age 75 years on 9th March 2024 at Khar

editor.prabhutarun@gmail.com

# Credits



**Kalpana Rane**

Editor



**Rohit Trilokekar**

Resident Editor



**Monica Rane Iyer**

Editorial Support



**Sanjana Kothare**

Editorial Support



**Shrinal Kothare**

Design Head



**Sunil Pawar**

Web Master